सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग



# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर
# स्वाधार योजना

सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, पुणे.
दूरध्वनी क्रमांक : ०२०-२९७०६६११, Email : acswopune@gmail.com

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या चांगल्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी विभागामार्फत शासकिय वसतिगृह कार्यरत आहेत. राज्यात दिवसेंदिवस वाढत असलेली व्यायसायिक, बिगर व्यावसायिक महाविद्यालयांची संख्या आणि तेथे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची वाढत असलेली संख्या यामुळे सर्वच विद्यार्थ्यांना वसतिगृहातील जागेची मर्यादा लक्षात घेता प्रवेश देणे शक्य होत नाही. पर्यायाने मोठ्या प्रमाणात विद्यार्थी शासकीय वसतिगृह प्रवेशापासुन वंचित राहतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी विविध अडचणींना सामोरे जावे लागत असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस मर्यादा येत आहेत. मागासवर्गीय शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती तथा नवबौद्ध घटकांतील इयत्ता ११ वी, १२ वी तसेच इयत्ता १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांना स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट जमा करण्याकरीता शासनाने **दि. ६ जानेवारी २०१७** च्या शासन निर्णयान्वये **''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना''** सुरु केलेली आहे.

सदर योजनेअंतर्गत शासकीय वसतीगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या तसेच शासकीय **वसतिगृह प्रवेशासाठी** रीतसर अर्ज केलेल्या परंतु शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे रक्कम समाज कल्याण विभागामार्फत अदा केली जाते.

| क्र. | खर्चाची बाब | पुणे, पिंपरी चिंचवड महानगर पालिका क्षेत्राच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | भोजन भत्ता | ३२,०००/- | २३,०००/- |
| २ | निवास भत्ता | २०,०००/- | १०,०००/- |
| ३ | निर्वाह भत्ता | ३०,०००/- | ५,०००/- |
| प्रति विद्यार्थी एकुण देय रक्कम (दोन सत्र, १० महिन्यासाठी) | | **60,000/-** | **38,000/-** |

(उपरोक्त रक्कमेव्यतिरिक्त वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्ष रु. ५,०००/- व अन्य शाखेतील विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष रु. २,०००/- इतकी रक्कम शैक्षणिक साहित्यासाठी ठोक स्वरुपात देण्यात येईल.)

## योजनेच्या अटी व शर्ती

१. स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रथम वसतीगृह प्रवेशासाठी अर्ज करावा लागतो त्यानुसार विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार प्रथमत: वसतीगृह प्रवेशासाठी निवड करण्यात येते व तद्नंतर गुणानुक्रमेच स्वाधार योजनेचा लाभ देण्यात येतो. * विद्यार्थ्यांस वसतिगृहात मिळालेला प्रवेश रद्द करुन म्हणजेच वसतिगृहातील जागा रिक्त करुन स्वाधार योजनेचा लाभ देता येणार नाही.

२. विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेली संस्था ज्या शहराच्या/तालुक्याच्या ठिकाणी आहे, विद्यार्थी अशा ठिकाणचा स्थानिक रहिवासी नसावा व तो आपल्या कुटुंबासोबत राहणारा नसावा.

३. विद्यार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न २.५० लाखापेक्षा जास्त नसावे.

४. शासकिय वसतिगृह प्रवेशासाठी पात्र असलेल्या अभ्यासक्रमास विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेला असावा.

५. विद्यार्थी कोणत्याही प्रकारची नोकरी किंवा व्यवसाय करत नसावा.

६. सदर योजनेचा लाभ केवळ पूर्ण वेळ अभ्यासक्रमासाठीच लागू राहील. अर्धवेळ अभ्यासक्रम, दुरस्थ व बहिस्थ अभ्यासक्रम, नोकरीसह करण्यात येणारा Executive Course यासाठी सदर योजनेचा लाभ घेता येणार नाही.

७. एका विद्यार्थ्यास जास्तीत जास्त ७ वर्ष या योजनेचा लाभ घेता येईल तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी एका विद्यार्थ्यास जास्तीत जास्त ८ वर्ष सदर योजनेचा लाभ घेता येईल.

८. विद्यार्थ्याला स्वाधार योजनेचा लाभ अनुज्ञेय होण्यासाठी कमाल वयोमर्यादा ३० वर्षे इतकी राहील.

९. या योजनेसाठी अनुसूचित जातीतील तृतीयपंथी पात्र असतील.

१०. विद्यार्थ्यास शासकीय वसतिगृह, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना किंवा व्यावसायिक पाठक्रमाशी संलग्न असणाऱ्या वसतिगृहात राहणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना या तीन योजनांपैकी एकाच योजनेचा लाभ घेता येईल. जर एकच विद्यार्थी एकापेक्षा अधिक योजनेचा लाभ एकाच कालावधीत घेत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विद्यार्थी फौजदारी गुन्ह्यास पात्र राहील व लाभार्थी विद्यार्थ्याने जो आर्थिक लाभ घेतला आहे ती रक्कम १२% व्याजासह वसुल करण्यात येईल.

११. ऊिद्यार्थी व शैक्षणिक संस्थांनी सदर योजनेमध्ये फसवणूक केल्याचे आढळल्यास संबंधित विद्यार्थी व शैक्षणिक संस्था कायदेशीर कारवाईस पात्र राहील. तसेच योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांने शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण न करता लाभ घेणे, शिक्षण न घेता नोकरी/व्यवसाय करुन या योजनेचा लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यास असा विद्यार्थी कारवाईस पात्र राहील व सदर योजगेंतर्गत दिलेल्या लाभाच्या रक्कमेची १२% व्याजासह वसुली करण्यात येईल. विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेला शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक राहील.

१२. स्वाधार योजनेसाठी अर्ज करताना विद्यार्थी ज्या अभ्यासक्रमात शिक्षण घेत आहे त्याच्या लगतच्या मागील वर्षात किमान ५० टक्के गुण किंवा त्याचप्रमाणात ग्रेडेशन सी.जी.पी.ए. असणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्यास वरील निकषाप्रमाणे गुण प्राप्त न झाल्यास विद्यार्थी पुढील लाभासाठी पात्र नसेल.

१३. एका शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ घेतल्यानंतर पुन्हा इतर शाखांची पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

१४. इयत्ता १२ वी नंतर पदविका, पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारा अभ्यासक्रम हा दोन वर्षांपेक्षा कमी नसावा. तसेच पदवीनंतर पदव्युत्तर पदवी / पदविका अभ्यासक्रमाचा कालावधीही दोन वर्षांपेक्षा कमी नसावा. (संबंधीत अभ्यासक्रम शासकीय वसतिगृहास प्रवेश मिळविण्यासाठी अनुज्ञेय असावा.)

१५. व्यावसायिक अभ्यासक्रम पुर्ण झाल्यानंतर बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी (पदवी/पदव्युत्तर) प्रवेश घेतला असल्यास स्वाधार योजनेचा लाभ घेता येणार नाही. (उदा. अभियांत्रिकेच्या पदवी-बी.ई. नंतर एम.ए.साठी प्रवेश घेतल्यास स्वाधार योजनेचा लाभ घेता येणार नाही.

१६. बिगर व्यावसायिक पदवीनंतर व्यावसायिक पदव्युत्तरला लाभ अनुज्ञेय राहील. (उदा. बी.ए. नंतर एल.एल.बी., बी.ए. नंतर बी.एड., बी.कॉम. नंतर एम.बी.ए.)

१७. स्वाधार योजनेंतर्गत निवड करण्यात आलेला विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत लाभास पात्र होईल. मात्र विद्यार्थ्यास प्रत्येक वर्षी त्या त्या अभ्यासक्रमाच्या परिक्षेत उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

१८. स्वाधार योजनेसाठी पात्र ठरलेल्या ज्या विद्यार्थ्यांना पदवी/पदव्युत्तर पदवी हे शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करताना एटीकेटी प्राप्त झाली असेल त्या विद्यार्थ्याला फक्त एकदाच या अटीतून सूट देण्यात येईल. (म्हणजेच एखाद्या विद्यार्थ्यास दुसऱ्यावेळेस एटीकेटी मिळाल्यास तो विद्यार्थी सदर योजनेचा पुढील लाभ घेण्यास अपात्र असेल. उदा. विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमास ६ सत्र असतील तर त्यास ६ सत्रांपैकी केवळ एका सत्रास एटकेटी (A.T.K.T.) पासून सवलत असेल. दुसऱ्या वेळेस म्हणजेच इतर सत्रास एटीकेटी (A.T.K.T.) प्राप्त झाल्यास विद्यार्थी पुढील लाभास पात्र नसेल.

१९. विद्यार्थ्याने प्रत्येक सत्र परिक्षेचा निकाल १५ दिवसांचे आत वेबासाईट वर अपलोड अथवा संबंधित कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

२०. विद्यार्थ्याची महाविद्यालयातील उपस्थिती किमान ७५% आवश्यक राहील. याबाबत विद्यार्थ्यास संबंधीत संस्थेचे प्रत्येक सत्राचे उपस्थिती प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल. तसेच विद्यार्थ्याची व वर्तणुक समाधानकारक असावी.

२१. शिक्षणात खंड पडलेला विद्यार्थी स्वाधार योजनेच्या लाभासाठी पात्र असेल तथापि शिक्षणातील खंड दोन वर्षापेक्षा जास्त असू नये.

२२. या योजनेसाठी कोणतीही खासबाब सवलत लागू असणार नाही.

## योजनेचा लाभ मिळण्याची प्रक्रिया

१. विद्यार्थ्याने वसतिगृह प्रवेशासाठी http ://hmasnew.mahait.org या वेबसाईटवर अर्ज करणे आवश्यक आहे. वसतीगृह प्रवेशासाठी पात्र असूनही रिक्त जागेअभावी वसतीगृहामध्ये प्रवेश न मिळाल्यास स्वाधार योजनेच्या लाभासाठी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह अर्ज http ://hmasnew.mahait.org या वेबसाईटवर अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जाची तपासणी केल्यानंतर अर्ज पात्र ठरल्यास प्रथम सत्राची रक्कम अदा केली जाईल.

२. दुसऱ्या सत्राची रक्कम मिळणेसाठी विद्यार्थ्याने प्रथम सत्राच्या परिक्षेचा निकाल लागल्यानंतर १५ दिवसांत निकालाची प्रत व महाविद्यालयातील उपस्थिती ७५% चे प्रमाणपत्र कार्यालयात जमा अथवा वेबसाईटवर अपलोड केल्यानंतर त्याची तपासणी करुन दुसऱ्या सत्राची रक्कम अदा केली जाते.

३. तिसऱ्या सत्राची रक्कम मिळणेसाठी अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षामध्ये प्रविष्ठ झाल्यानंतर विद्यार्थ्याने वेबसाईट वर नूतनीकरणाचा अर्ज करणे आवश्यक आहे. सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर तपासणी अंती पात्र ठरल्यानंतर रक्कम अदा केली जाते. यासाठी पहिल्या व दुसऱ्या सत्राचे गुणपत्रक व उपस्थिती प्रमाणपत्र आवश्यक आहे.

४. चौथ्या सत्राची रक्कम मिळणेसाठी विद्यार्थ्याने पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या सत्राच्या परीक्षेचे गुणपत्रक व महाविद्यालयातील उपस्थिती प्रमाणपत्र कार्यालयात अथवा http ://hmasnew.mahait.org या वेबसाईटवर अपलोड करणे आवश्यक आहे. तपासणी अंती पात्र ठरल्यानंतरच रक्कम अदा केली जाईल.

५. अभ्यासक्रमाच्या पुढील सत्रांची रक्कम मिळणेसाठी वरीलप्रमाणे अ.क्र.३ व अ.क्र.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणेच प्रक्रीया

## योजनेचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रे

१. अनुसूचित जाती तथा नवबौद्ध असल्याचे जात प्रमाणपत्र.
२. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे अधिवास प्रमाणपत्र.
३. महाविद्यालयात प्रवेश घेतल्याचा पुरावा (**Bonafied Certificate**).
४. पालकांचा उत्पन्नाचा दाखला.
५. मागील वर्षांचे सर्व गुणपत्रक.
६. कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवेश घेतला नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.
७. भाड्याने राहत असल्याबाबत व स्थानिक रहिवाशी नसल्याचे प्रतिज्ञापत्र (नोटरी).
८. भाड्याने राहत असल्याबाबतचे भाडे करारनामा. जर विद्यार्थी खाजगी वसतीगृहात रहात असेल तर वसतीगृह प्रमुखांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र आवश्यक.
९. विद्यार्थ्याने सादर केलेली माहिती खरी व अचूक असल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र.

समता न्याय एकात्मता
महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय विभाग


**सहायक आयुक्त, समाज कल्याण, पुणे.**

**दूरध्वनी क्रमांक : ०२०-२९७०६६११, Email : acswopune@gmail.com**